९८५१५

परिशिष्ट 'अे'

२४७।

महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे
दिनांक 29 OCT 2011
आवक क्र.: ५२८२ शाखा: शि.प्र.
सहसंचालक (प्रशा.)

कृषी विद्यापीठांतर्गत पदवी, पदव्युत्तर व आचार्य पदवी अभ्यासक्रमामध्ये जागांचे आरक्षण, सामाजिक आरक्षणाच्या वाटपाची कार्यपध्दती व प्रवेश कार्यपध्दती निश्चित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
शासन निर्णय क्रमांक : संकृवि २०१०/प्र.क्र. १५५/७अे
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २० ऑक्टोबर २०११

३१७

वाचा :- (१) शासन निर्णय, कृषी व पदुम विभाग, क्र.ओजीयु-२३८८/सीआर-७०/२०-अे, दि.२८/४/१९८९.
(२) शासन निर्णय, कृषी व पदुम विभाग, क्र.ओजीयु-२३८८/सीआर-७०/२०-अे, दि.५/२/१९९०
(३) शासन निर्णय, कृषी व पदुम विभाग, क्र.ओजीयु-११९३/४९४७२/सीआर-२/१९-अे, दि.३०/६/१९९४
(४) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्र.टीईएम ३३९७/१२९२६/ (९०८६) /तांशि-१, दि.११/७/१९९७.
(५) शासन निर्णय, कृषी व पदुम विभाग, क्र.कृषिवि २००२/ सीआर २६९/२०-अे, दि.२३/५/२००३.
(६) शासन निर्णय, कृषी व पदुम विभाग, क्र.कृषिवि २००३/ प्रक्र २२३/२०-अे, दि.१६/३/२००४.
(७) महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद यांचे पत्र क्र. मकृप/शिक्षण- १/३३११/१३३६, दि.११/७/२०११

प्रस्तावना :

सन २०१०/११ या शैक्षणिक वर्षामध्ये प्रवेश प्रक्रियेंतर्गत 'अन्नतंत्रज्ञान' या पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी 'भटक्या जमाती' (Nomadic Tribes) या प्रवर्गाकरिता ११ टक्के जागा उपलब्ध करुन दिल्या नसल्याच्या कारणास्तव मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे रीट याचिका क्र. ८६६३/२०१० दाखल करण्यात आली होती.

उपरोक्त याचिकेसंदर्भात मा.उच्च न्यायालयाने दि.२५/०४/२०११ रोजी दिलेल्या अंतिम आदेशाच्या अनुषंगाने राज्यातील कृषी विद्यापीठांतर्गत मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरिता आरक्षित जागांवर शैक्षणिक प्रवेश देतांना या विद्यार्थ्यांवर अन्याय होऊ नये व ते प्रवेशापासून वंचित राहू नयेत, याबाबतचे धोरण ठरविण्याकरिता शासन निर्णय क्र. ओजीयु-२०१०/ प्र.क्र.१५५/ ७-अे, दि.२६/४/२०११ नुसार मा.महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने सादर केलेला अहवाल शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय:-

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत पदवी अभ्यासक्रमाच्या घटक व अनुदानित महाविद्यालयांमध्ये प्रवेश क्षमतेच्या ५ टक्के जागा भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या कोट्यासाठी राखून ठेवण्यात याव्यात. प्रवेश क्षमतेच्या १५ टक्के जागा भारतीय पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या घटक व अनुदानित महाविद्यालयांमध्ये प्रवेश क्षमतेच्या १५ टक्के जागा भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या कोट्यासाठी राखून ठेवण्यात याव्यात. याव्यतिरिक्त पदवी व पदव्युत्तर

अभ्यासक्रमाच्या घटक व अनुदानित महाविद्यालयांमध्ये प्रवेश क्षमतेपेक्षा १० टक्के अतिरिक्त जागा भारतीय कृषी अनुसंधान परिषदेकडून भरण्यात याव्यात.

उमेदवाराने ज्या तारखेला प्रवेश मागितला असेल त्या तारखेच्या लगतपूर्वीच्या १० वर्षे मुदतीमध्ये किमान तीन वर्षे ज्या व्यक्ती व ज्यांच्या आईवडिलांनी या राज्यात निवास केलेला नसेल, अशा किंवा राज्याबाहेरील उमेदवारांकरिता (ओएस) पदवी, पदव्युत्तर व आचार्य पदवी अभ्यासक्रमाच्या घटक व अनुदानित महाविद्यालयांमध्ये २ टक्के जागा राखून ठेवण्यात याव्यात.

पदवी अभ्यासक्रमाच्या कायमस्वरूपी विना अनुदानित महाविद्यालयांमधील २० टक्के जागा व्यवस्थापन कोटयाकरिता राखून ठेवण्यात याव्यात. या जागांवर प्रवेश घेण्याकरिता फक्त केंद्रीय प्रवेश प्रक्रियेंतर्गत प्राप्त प्रवेश अर्जच ग्राह्य धरण्यात यावेत.

पदवी, पदव्युत्तर व आचार्य पदवी अभ्यासक्रमाच्या घटक व अनुदानित महाविद्यालयांमधील नमूद केलेल्या उपरोक्त जागा व कायमस्वरूपी विना अनुदानित महाविद्यालयांमध्ये व्यवस्थापन कोटयातील जागा वगळून, उर्वरित जागा खाली निर्देशित केलेल्या टक्केवारीनुसार राखून ठेवण्यांत याव्यात.

(अ) सामाजिक आरक्षण

| अ.क्र. | संवर्ग | टक्केवारी |
|---|---|---|
| (१) | अनुसूचित जाती / नवबौध्द (एस्सी) | १३ |
| (२) | अनुसूचित जमाती (एस्टी ) | ०७ |
| (३) | विमुक्त जाती (अ) (व्हीजे -ए) (१४ व इतर) | ०३ |
| (४) | भटक्या जमाती (ब) (एन्टी-बी) (१९९० पूर्वीच्या सूचीप्रमाणे २८ व इतर) | २.५ |
| (५) | भटक्या जमाती (क) (एन्टी - सी ) | ३.५ |
| (६) | भटकया जमाती (ड) (एन्टी - डी) | ०२ |
| (७) | इतर मागास वर्गीय (ओबीसी) विशेष मागास प्रवर्गातील जातींना इतर मागास प्रवर्ग म्हणून समजले जाईल | १९ |
| | एकूण | ५० |

वर नमूद केलेल्या आरक्षणाव्यतिरिक्त प्रवेश प्रक्रियेसाठी लागू असलेले विशेष आरक्षण पुढीलप्रमाणे आहे.

(ब) विशेष आरक्षण

| अ.क्र. | संवर्ग | टक्केवारी |
|---|---|---|
| (१) | स्वातंत्र्य सैनिकाचे पाल्य (एफ्एफ्) | २ |
| (२) | अपंग<br>अ) अंधत्व किंवा क्षीणदृष्टी (blindness or low vision)<br>ब) श्रवण शक्तीतील दोष (hearing impairment)<br>क) चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू (locomotor disability or cerebral palsy) | ३ |
| (३) | आजी व माजी सैनिकांची मुले (डीपी) | २ |

१८८।५

२५१।५

| अ.क्र. | संवर्ग | टक्केवारी |
| --- | --- | --- |
| (४) | महाराष्ट्र प्रकल्प बाधितांचे पुनर्वसन अधिनियम, १९९९ अन्वये प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या व्यक्तींची मुले प्रकल्पबाधित. (पीएपी) | ४ |
| (५) | शेतकरी व विहित किमान अर्हता असलेले किंवा कृषीविषयक अनुभव असलेली शेतक-यांची मुले. (श्रेजी) | ६ |
| (६) | महिला | ३० |

खुल्या असलेल्या जागा व सामाजिक आरक्षित संवर्गामध्ये विशेष आरक्षण गुणवत्तेनुसार समाविष्ट राहतील.

सामाजिक आरक्षण व विशेष आरक्षण निर्धारित व्हावे आणि सर्वांना समान न्याय मिळावा, या दृष्टिकोनातून **परिशिष्ट-१** येथे विशद करण्यात आल्याप्रमाणे सामाजिक आरक्षणाच्या वाटपाची कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी. तसेच **परिशिष्ट-२** येथे विशद करण्यात आल्याप्रमाणे प्रवेश कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी.

महाराष्ट्र कृषी विद्यापीठे अधिनियम, १९८३ च्या कलम १२ (३) (डी) मधील तरतुदीनुसार राज्यातील कृषी विद्यापीठांतर्गत पदवी, पदव्युत्तर व आचार्य पदवी अभ्यासक्रमाच्या घटक, अनुदानित व कायम विना अनुदानित महाविद्यालयांना परवानगी देण्याचे (to grant permission) आणि सदर महाविद्यालयांमध्ये केंद्रीय पध्दतीने प्रवेश प्रक्रिया राबविण्याचे / विहित करण्याचे तसेच प्रवेशासाठी गुणाधिभार / अतिरिक्त गुण (Weightages) देण्याबाबतचे धोरण निश्चित करण्याचे आणि कृषी विद्यापीठांतर्गत सर्व प्रकारच्या कृषी अभ्यासक्रमांचे प्रवेश, शैक्षणिक व इतर शुल्क निश्चित करण्याचे अधिकार महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांना प्रदान करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(डॉ. सुधीर कुमार गोयल)
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

(१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
(२) मा.मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
(३) मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
(४) मा. मंत्री (कृषी) / मा. राज्यमंत्री (कृषी) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
(५) महासंचालक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे.
(६) मा.कुलगुरु / कुलसचिव / नियंत्रक, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली
(७) मा.कुलगुरु / कुलसचिव / नियंत्रक, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
(८) मा.कुलगुरु / कुलसचिव / नियंत्रक, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
(९) मा.कुलगुरु / कुलसचिव / नियंत्रक, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी
(१०) आयुक्त (कृषी), महाराष्ट्र राज्य, पुणे
(११) आयुक्त (पशुसंवर्धन), महाराष्ट्र राज्य, पुणे
(१२) आयुक्त (मत्स्यव्यवसाय), महाराष्ट्र राज्य, मुंबई
(१३) आयुक्त (दुग्धविकास), महाराष्ट्र राज्य, मुंबई
(१४) सर्व विभागीय आयुक्त,

(१५) सर्व जिल्हाधिकारी,
(१६) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
(१७) महालेखापाल, १ / २, महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर
(१८) मुख्य लेखा परीक्षण अधिकारी, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, मुंबई
(१९) सर्व मंत्रालयीन विभाग,
(२०) सर्व उपसचिव / अवर सचिव / कार्यासन अधिकारी, कृषी व पदुम विभाग,
(२१) निवड नस्ती.

## परिशिष्ट – १

### सामाजिक आरक्षणाच्या वाटपाची कार्यपध्दती

१. चारही कृषी विद्यापीठांतर्गत पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासंदर्भात भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली आणि राज्याबाहेरील उमेदवारांकरिता राखीव असलेल्या जागा वगळून, तसेच आचार्य पदवी अभ्यासक्रमासंदर्भात राज्याबाहेरील उमेदवारांकरिता राखीव असलेल्या जागा वगळून, उर्वरित जागा 'महाराष्ट्र' व 'विद्यापीठ' कोटयातून भरण्यात याव्यात. 'महाराष्ट्र' व 'विद्यापीठ' कोटयातील जागांच्या प्रवेश प्रक्रियेकरिता दरवर्षी महाविद्यालय/केंद्रनिहाय सामाजिक व विशेष आरक्षणाचे वाटप करण्यात यावे.

२. ज्या सामाजिक प्रवर्गांना आरक्षणाची टक्केवारी कमी आहे, अशा प्रवर्गांना कमी प्रवेश क्षमता असलेल्या महाविद्यालय / केंद्रामध्ये वर्षानुवर्षे जागा उपलब्ध होत नाहीत. पर्यायाने असे उमेदवार या अभ्यासक्रमापासून वंचित राहतात, त्यामुळे भविष्यात सेवा भरती करतांना अशा प्रवर्गातील उमेदवारच उपलब्ध होणार नाहीत. तसेच कमी प्रवेश क्षमता आणि जागांची विषम संख्या असलेल्या महाविद्यालय / केंद्राच्या ठिकाणी प्रवेश क्षमतेच्या किमान ५० टक्के आरक्षण निर्धारित होत नाही. त्यासाठी ५० टक्के जागा सामाजिक मागास प्रवर्गांकरिता उपलब्ध करून, यापैकी ज्या सामाजिक मागास प्रवर्गांना त्यांच्या टक्केवारीनुसार जागा उपलब्ध होतात, त्यांच्यासाठी त्या जागा आरक्षित कराव्यात आणि ५० टक्क्यांपैकी काही जागा शिल्लक असल्यास, अशा जागा (सामाजिक मागास प्रवर्गाच्या टक्केवारीनुसार जागा उपलब्ध झालेला प्रवर्ग वगळून) ज्या सामाजिक मागास प्रवर्गांना कमी टक्केवारीमुळे जागा उपलब्ध होत नाहीत, अशा सामाजिक मागास प्रवर्गांना 'जादा टक्केवारीस प्रथम प्राधान्य' या तत्वावर क्रमवारीने (By Rotation) दरवर्षी उपलब्ध करून देण्यात याव्यात. उदा. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), इतर मागासवर्ग या प्रवर्गांना जागा उपलब्ध होत नसल्यास, या प्रवर्गांना त्यांच्या टक्केवारीचे जादा प्रमाण विचारात घेऊन म्हणजेच इतर मागास वर्ग (१९ टक्के), अनुसूचित जाती (१३ टक्के), अनुसूचित जमाती (७ टक्के), भटक्या जमाती (क) (३.५ टक्के), विमुक्त जाती (अ) (३ टक्के), भटक्या जमाती (ब) (२.५ टक्के), भटक्या जमाती (ड) (२ टक्के) अशा क्रमवारीने दरवर्षी जागा उपलब्ध करून देण्यात याव्यात. प्रवेश क्षमता विषम संख्येत असल्यास वरील क्रमवारीनुसार अशा जागा गुणवत्तेनुसार सर्व उपलब्ध उमेदवारामधून त्या वर्षी भरण्यात याव्यात. यामुळे सर्व प्रवर्गांना न्याय्य मार्गाने जागा उपलब्ध करून देणे शक्य होईल. यासाठी पुढीलप्रमाणे उदाहरणासह स्पष्ट करण्यात आले आहे.

(१) १० प्रवेश क्षमता असलेल्या महाविद्यालय / केंद्राचे वाटप करण्यासाठी खालील कार्यपध्दती अनुसरावी लागेल.

| प्रवर्ग | आरक्षणाची टक्केवारी | टक्केवारी नुसार येणारी अपूर्णांकातील संख्या | टक्केवारीची संख्या पूर्णांकात करून वाटप करावयाच्या जागा |
|---|---|---|---|
| अनुसूचित जाती | १३ | १.३ | १ |
| अनुसूचित जमाती | ०७ | ०.७ | १ |
| विमुक्त जाती (अ) | ०३ | ०.३ | ० |
| भटक्या जमाती (ब) | २.५ | ०.३ | ० |
| [illegible] | ३.५ | ०.४ | [illegible] |

| | | | |
|---|---|---|---|
| भटक्या जमाती (ड) | ०२ | ०.२ | ० |
| इतर मागासवर्गीय | १९ | १.९ | २ |
| उर्वरित जागा खुल्या प्रवर्गासाठी | | | ६ |

विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क) आणि भटक्या जमाती (ड) या प्रवर्गांना जागा उपलब्ध होत नाहीत. तसेच सामाजिक आरक्षणासाठी ४० टक्के व खुल्या प्रवर्गासाठी ६० टक्के जागा उपलब्ध होतात. त्यामुळे ५० टक्के आरक्षण निर्धारित होत नाही. ही बाब विचारात घेऊन एकूण जागांपैकी एक जागा विमुक्त जाती (अ) / भटक्या जमाती (ब) / भटक्या जमाती (क) / भटक्या जमाती (ड) या प्रवर्गांना 'जावा टक्केवारीस प्रथम प्राधान्य' या तत्वावर वाटप करण्यात यावी.

म्हणजेच पहिले वर्ष भटक्या जमाती (क) (३.५ टक्के),

दुसरे वर्ष विमुक्त जाती (अ) (३ टक्के);

तिसरे वर्ष भटक्या जमाती (ब) (२.५ टक्के) आणि

चौथे वर्ष भटक्या जमाती (ड) (२ टक्के) हा क्रम संपल्यानंतर-

पाचव्या वर्षापासून पुन्हा वरील क्रमाने जागा उपलब्ध करून देण्यात याव्यात.

(२) ७ प्रवेश क्षमता असलेल्या महाविद्यालय / केंद्राचे वाटप करण्यासाठी खालील कार्यपध्दती अनुसरावी लागेल.

| प्रवर्ग | आरक्षणाची टक्केवारी | टक्केवारी नुसार येणारी अपूर्णांकातील संख्या | टक्केवारीची संख्या पूर्णांकात करून वाटप करावयाच्या जागा |
|---|---|---|---|
| अनुसूचित जाती | १३ | ०.९१ | १ |
| अनुसूचित जमाती | ०७ | ०.४९ | ० |
| विमुक्त जाती (अ) | ०३ | ०.२१ | ० |
| भटक्या जमाती (ब) | २.५ | ०.१८ | ० |
| भटक्या जमाती (क) | ३.५ | ०.२५ | ० |
| भटक्या जमाती (ड) | ०२ | ०.१४ | ० |
| इतर मागासवर्गीय | १९ | १.३३ | १ |
| उर्वरित जागा खुल्या प्रवर्गासाठी | | | ५ |

अनुसूचित जमाती, विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क) आणि भटक्या जमाती (ड) या प्रवर्गांना जागा उपलब्ध होत नाहीत. ५० टक्के आरक्षण विचारात घेता एकूण जागांचा विचार करता आरक्षित प्रवर्गांना ३.५ आणि खुल्या प्रवर्गास ३.५ जागा उपलब्ध होणे आवश्य आहे. अशाप्रकरणी प्रथम वर्षी ४ जागा खुल्या प्रवर्गासाठी आणि ३ जागा आरक्षित प्रवर्गासाठी वाट [illegible] आरक्षित प्रवर्गामध्ये इतर मागासप्रवर्ग व अनुसूचित जाती या प्रवर्गा

टक्केवारीनुसार प्रत्येकी एक जागेचे वाटप होत असल्याने उर्वरित तिसरी जागा 'जादा टक्केवारीस प्रथम प्राधान्य' या तत्त्वावर अनुसूचित जमाती (७ टक्के) या प्रवर्गास वाटप करण्यात यावी.

दुस-या वर्षी ३ जागा खुल्या पध्दतीने वाटप करण्यात येऊन ४ जागा आरक्षित प्रवर्गासाठी वाटप करण्यात याव्यात. आरक्षित प्रवर्गामध्ये इतर मागासप्रवर्ग व अनुसूचित जाती या प्रवर्गांना टक्केवारीनुसार प्रत्येकी एक जागेचे वाटप करण्यात यावे. अनुसूचित जमाती (७ टक्के) या प्रवर्गास पहिल्या वर्षी लाभ देण्यात आलेला असल्याने उर्वरित दोन जागा 'जादा टक्केवारीस प्रथम प्राधान्य' या तत्वावर अनुसूचित जमाती (७ टक्के) वगळता भटक्या जमाती (क) (३.५ टक्के) व विमुक्त जाती (अ) (३ टक्के) यांना प्रत्येकी एक याप्रमाणे वाटप करण्यात यावे.

तिस-या वर्षी खुल्या ३ जागा वाटप करण्यात येऊन ४ जागा आरक्षित प्रवर्गासाठी वाटप करण्यात याव्यात. आरक्षित प्रवर्गामध्ये इतर मागासप्रवर्ग व अनुसूचित जाती या प्रवर्गांना टक्केवारीनुसार प्रत्येकी एक जागेचे वाटप करण्यात यावे. अनुसूचित जमाती (७ टक्के) या प्रवर्गास पहिल्या वर्षी लाभ देण्यात आलेला आहे. भटक्या जमाती (क) (३.५ टक्के) व विमुक्त जाती (अ) (३ टक्के) या प्रवर्गांना दुस-या वर्षी लाभ देण्यात आलेला आहे. त्यामुळे उर्वरित दोन जागा भटक्या जमाती (ब) (२.५ टक्के) आणि भटक्या जमाती (ड) (२ टक्के) या प्रवर्गांना प्रत्येकी एक याप्रमाणे वाटप करण्यात यावे.

चौथ्या वर्षापासून पुन्हा वरील दरवर्षीच्याच क्रमाने जागांचे वाटप करण्यात यावे.

(३) ५ प्रवेश क्षमता असलेल्या महाविद्यालय / केंद्राचे वाटप करण्यासाठी खालील कार्यपध्दती अनुसरावी लागेल.

| प्रवर्ग | आरक्षणाची टक्केवारी | टक्केवारी नुसार येणारी अपूर्णांकातील संख्या | टक्केवारीची संख्या पूर्णांकात करून वाटप करावयाच्या जागा |
|---|---|---|---|
| अनुसूचित जाती | १३ | ०.७ | १ |
| अनुसूचित जमाती | ०७ | ०.४ | ० |
| विमुक्त जाती (अ) | ०३ | ०.२ | ० |
| भटक्या जमाती (ब) | २.५ | ०.१ | ० |
| भटक्या जमाती (क) | ३.५ | ०.२ | ० |
| भटक्या जमाती (ड) | ०२ | ०.१ | ० |
| इतर मागासवर्गीय | १९ | १ | १ |
| उर्वरित जागा खुल्या प्रवर्गासाठी | | | ३ |

अनुसूचित जमाती, विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क) आणि भटक्या जमाती (ड) या प्रवर्गांना जागा उपलब्ध होत नाहीत. याचबरोबर ५० टक्के आरक्षण निर्धारित होत नाही. ही बाब विचारात घेऊन एकूण जागांपैकी एक जागा अनुसूचित जमाती, विमुक्त जाती (अ),

भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क) आणि भटक्या जमाती (ड) या प्रवर्गांना 'जादा टक्केवारीस प्रथम प्राधान्य' या तत्वावर वाटप करण्यात यावी. म्हणजेच

पहिले वर्ष अनुसूचित जमाती (७ टक्के),

दुसरे वर्ष भटक्या जमाती (क) (३.५ टक्के),

तिसरे वर्ष विमुक्त जाती (अ) (३ टक्के),

चौथे वर्ष भटक्या जमाती (ब) (२.५ टक्के),

पाचवे वर्ष भटक्या जमाती (ड) (२ टक्के) हा क्रम संपल्यानंतर सदर जागा सहाव्या वर्षी खुल्या पध्दतीने उपलब्ध करुन सातव्या वर्षापासून पुन्हा वरील क्रमाने जागा उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

(४) ३ प्रवेश क्षमता असलेल्या महाविद्यालय / केंद्राचे वाटप करण्यासाठी खालील कार्यपध्दती अनुसरावी लागेल.

| प्रवर्ग | आरक्षणाची टक्केवारी | टक्केवारी नुसार येणारी अपूर्णांकातील संख्या | टक्केवारीची संख्या पूर्णांकात करुन वाटप करावयाच्या जागा |
|---|---|---|---|
| अनुसूचित जाती | १३ | ०.३९ | ० |
| अनुसूचित जमाती | ०७ | ०.२१ | ० |
| विमुक्त जाती (अ) | ०३ | ०.०९ | ० |
| भटक्या जमाती (ब) | २.५ | ०.७५ | ० |
| भटक्या जमाती (क) | ३.५ | ०.११ | ० |
| भटक्या जमाती (ड) | ०२ | ०.०६ | ० |
| इतर मागासवर्गीय | १९ | ०.५७ | १ |
| उर्वरित जागा खुल्या प्रवर्गासाठी | | | २ |

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क) आणि भटक्या जमाती (ड) या प्रवर्गांना जागा उपलब्ध होत नाहीत. याचबरोबर ५० टक्के आरक्षण निर्धारित होत नाही. ५० टक्के आरक्षण विचारात घेता आरक्षित प्रवर्गांना १.५ आणि खुल्या प्रवर्गास १.५ जागा उपलब्ध होणे आवश्यक आहे. अशाप्रकरणी दरवर्षी १ जागा खुली व एक जागा इतर मागासप्रवर्गास वाटप करण्यात यावी. उर्वरित तिसरी जागा 'जादा टक्केवारीस प्रथम प्राधान्य' या तत्वावर

पहिल्या वर्षी खुली (म्हणजेच दोन जागा),

दुस-या वर्षी अनुसूचित जाती (१३ टक्के),

तिस-या वर्षी अनुसूचित जमाती (७ टक्के),

चौथ्या वर्षी भटक्या जमाती (क) (३.५ टक्के),

पाचव्या वर्षी विमुक्त जाती (अ) (३ टक्के),

सहाव्या वर्षी भटक्या जमाती (ब) (२.५ टक्के),

सातव्या वर्षी भटक्या जमाती (ड) (२ टक्के) अशा जागा उपलब्ध करून देण्यात याव्यात.

आठव्या वर्षी तिसरी जागा पुन्हा खुली ठेवून उक्त क्रम चालू ठेवावा.

<u>टीप :</u> उपरोक्त चारही उदाहरणे केवळ १ ते १० या अंकामधील सम व विषय संख्यांनाच लागू नसून त्यापुढील सर्व सम व विषम संख्यांबाबतदेखील लागू आहेत.

३. उपरोक्त विशद केलेल्या प्रवेशपध्दतीनुसार जागा वाटपाच्या क्रमवारीची कायमस्वरूपी नोंद असण्याकरिता चारही कृषी विद्यापीठांनी कुलसचिव यांच्या स्तरावर सोबत जोडलेल्या प्रपत्र 'अ', 'ब' आणि 'क' मधील नमुन्यात अनुक्रमे पदवी, पदव्युत्तर आणि आचार्य पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशितांसंबंधीची नोंदवही ठेवावी. तसेच चारही कृषी विद्यापीठांतर्गत वरील क्रमवारीची एकत्रित नोंदवही कृषी परिषद कार्यालयात ठेवण्यात यावी.

२२७

## परिशिष्ट २

## प्रवेश कार्यपध्दती

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत पदवी, पदव्युत्तर आणि आचार्य पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशांतर्गत सामाजिक आरक्षणाचा लाभ देण्याचा प्राधान्यक्रम व रिक्त जागांच्या रूपांतरणाची कार्यपध्दती खालीलप्रमाणे विहित करण्यात यावी.

(१) महाराष्ट्र व विद्यापीठ कोटयातील जागांवर प्रवेश देण्यासाठी पुढील क्रम अवलंबिण्यात यावा:-

(i) 'महाराष्ट्र' कोटयातील खुल्या जागांतर्गत सामाजिक प्रवर्गनिहाय.

(ii) 'विद्यापीठ' कोटयातील खुल्या जागांतर्गत सामाजिक प्रवर्गनिहाय.

(iii) 'महाराष्ट्र' कोटयातील खुल्या जागा (Open to all as per merit).

(iv) 'विद्यापीठ' कोटयातील खुल्या जागा.

(v) 'महाराष्ट्र' कोटयातील सामाजिक आरक्षणांतर्गत विशेष प्रवर्ग.

(vi) 'विद्यापीठ' कोटयातील सामाजिक आरक्षणांतर्गत विशेष प्रवर्ग.

(vii) 'महाराष्ट्र' कोटयातील सामाजिक प्रवर्ग.

(viii) 'विद्यापीठ' कोटयातील सामाजिक प्रवर्ग.

(२) एकापेक्षा जास्त विशेष प्रवर्ग असलेल्या उमेदवारास विशेष प्रवर्गाचा लाभ देण्याचा प्राधान्यक्रम संबंधित कोटयामधून (महाराष्ट्र / विद्यापीठ कोटा) खालीलप्रमाणे असावा.

(अ) स्वातंत्र्य सैनिकाचे पाल्य (एफ्एफ्).

(ब) अपंग

१) अंधत्व किंवा क्षीणदृष्टी (blindness or low vision)

२) श्रवण शक्तीतील दोष (hearing impairment)

३) चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू (locomotor disability or cerebral palsy)) (पीएच्).

(क) आजी व माजी सैनिकांची मुले (डीपी),

(ड) महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९९९ मधील तरतुदींप्रमाणे प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या व्यक्तींची मुले (पीओपी),

(इ) शेतकरी व विहित किमान अर्हता असलेले किंवा कृषीविषयक अनुभव असलेली शेतक-यांची मुले (अेजी).

(३) संबंधित प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध नसल्यास, रिक्त असलेल्या जागा खालील टप्प्यानुसार इतर प्रवर्गास रूपांतरित करण्यात याव्यात.

(अ) संबंधित प्रवर्गातील महिला उमेदवार उपलब्ध नसल्यास, अशा महिलांसाठी राखीव असलेल्यांपैकी रिक्त जागा, संबंधित कोटयामधून (महाराष्ट्र / विद्यापीठ कोटा) त्या त्या प्रवर्गातील पुरुष उमेदवारांसाठी रूपांतरित करण्यात याव्यात.

(ब) राज्याबाहेरील उमेदवारांसाठी राखीव असलेल्या जागा रिक्त राहिल्यास-

(१) अशा रिक्त जागांची 'महाराष्ट्र' व 'विद्यापीठ' कोटयामध्ये विभागणी करण्यात

९६४१५

२६७/२

(i) पदवी अभ्यासक्रमासंदर्भात अशी विभागणी रिक्त जागांच्या ३० टक्के जागा 'महाराष्ट्र' कोटा आणि रिक्त जागांच्या ७० टक्के जागा संबंधित 'विद्यापीठ' कोटा अशी असावी.

(ii) पदव्युत्तर व आचार्य पदवी अभ्यासक्रमासंदर्भात रिक्त जागांच्या ५० टक्के जागा 'महाराष्ट्र' कोटा आणि रिक्त जागांच्या ५० टक्के जागा संबंधित 'विद्यापीठ' कोटा अशी विभागणी करावी.

(२) या रिक्त जागांचे संबंधित कोटयामध्ये सामाजिक व विशेष आरक्षणाच्या टक्केवारीनुसार वाटप करावे.

(क) खुल्या जागांतर्गत / संबंधित सामाजिक प्रवर्गांतर्गत विशेष प्रवर्गाचे उमेदवार उपलब्ध नसल्यास, अशा विशेष आरक्षित जागा संबंधित कोटयामधून (महाराष्ट्र / विद्यापीठ कोटा) खुल्या जागांतर्गत / संबंधित सामाजिक प्रवर्गांसाठी खालील प्रमाणे रूपांतरित करण्यात याव्यात.

(१) 'महाराष्ट्र' कोटयातील खुल्या जागांतर्गत विशेष प्रवर्गाचे उमेदवार उपलब्ध नसल्यास, अशा विशेष आरक्षित जागा 'महाराष्ट्र' कोटयातील सर्व पात्र उमेदवारांमधून गुणवत्तानुक्रमाने भरण्यात याव्यात.

(२) 'महाराष्ट्र' कोटयातील सामाजिक प्रवर्गांतर्गत विशेष प्रवर्गाचे उमेदवार उपलब्ध नसल्यास, अशा विशेष आरक्षित जागा 'महाराष्ट्र' कोटयामधून सामाजिक प्रवर्गासाठी रूपांतरित करण्यात याव्यात.

(३) 'विद्यापीठ' कोटयातील खुल्या प्रवर्गांतर्गत विशेष प्रवर्गाचे उमेदवार उपलब्ध नसल्यास, अशा विशेष आरक्षित जागा 'विद्यापीठ' कोटयातील सर्व पात्र उमेदवारांमधून गुणवत्तानुक्रमाने भरण्यात याव्यात.

(४) विद्यापीठ कोटयातील सामाजिक प्रवर्गांतर्गत विशेष प्रवर्गाचे उमेदवार उपलब्ध नसल्यास, अशा विशेष आरक्षित जागा विद्यापीठ कोटयामधून सामाजिक प्रवर्गासाठी रूपांतरित करण्यात याव्यात.

(ड) (१) सामाजिक आरक्षणांतर्गत संबंधित सामाजिक प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध नसल्यास, शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्र.टीईएम ३३९७/१२९२६/(९०८६) /तांशि-१, दि.११/७/१९९७ नुसार, संबंधित महाविद्यालयाच्या / केंद्राच्या एकूण प्रवेश क्षमतेच्या जास्तीत जास्त २ टक्क्यांपर्यंतच्या जागा 'विशेष मागास प्रवर्गा'च्या उमेदवारांसाठी प्रथम उपलब्ध करून देण्यात याव्यात.

(२) विशेष मागासप्रवर्गातील उमेदवार प्रवेशासाठी उपलब्ध नसल्यास, 'विद्यापीठ' कोटयातील सामाजिक आरक्षित जागा संबंधित सामाजिक प्रवर्गासाठी 'महाराष्ट्र' कोटयामध्ये रूपांतरित करण्यात याव्यात.

(इ) (१) २ टक्क्यांपर्यंतच्या जागांवर प्रवेश दिल्यानंतर सामाजिक प्रवर्गांमध्ये जागा रिक्त असल्यास, त्या जागांची संबंधित कोटयामध्ये (महाराष्ट्र / विद्यापीठ कोटा) सरमिसळ करून इतर सर्व सामाजिक आरक्षणांतर्गत मागासवर्गीय उमेदवारांना रिक्त जागा उपलब्ध करून देण्यात याव्यात.

(२) 'विद्यापीठ' कोटयातील सामाजिक प्रवर्गांसाठी राखीव असलेल्या जागांवर उमेदवार उपलब्ध नसल्यास, अशा रिक्त जागा 'महाराष्ट्र' कोटयातील सामाजिक प्रवर्गातील उमेदवारांसाठी उपलब्ध करून देण्यात याव्यात.

(३) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्र.टीईएम ३३९७/१२९२६/ (९०८६) /तांशि-१, दि.११/७/१९९७ नुसार जागांची सरमिसळ करण्यात आलेली असल्याने, अशा रिक्त जागा कोणत्या प्रवर्गाच्या आहेत हे निश्चित करता येत नाही. त्यामुळे अशा रिक्त जागा सामाजिक व विशेष आरक्षणाच्या टक्केवारीप्रमाणे 'महाराष्ट्र' कोटयाद्वारे उपलब्ध करून देण्यात याव्यात.

(फ) 'महाराष्ट्र' कोटयातील सामाजिक प्रवर्गांसाठी राखीव असलेल्या जागांवर उमेदवार उपलब्ध नसल्यास, अशा रिक्त जागा 'महाराष्ट्र' कोटयातील सर्व पात्र उमेदवारांमधून गुणवत्तानुक्रमाने भरण्यात याव्यात.

(ग) 'महाराष्ट्र' कोटयामध्ये कोणताही उमेदवार उपलब्ध नसल्यास, अशा रिक्त जागा राज्याबाहेरील उमेदवारांसाठी उपलब्ध करून देण्यात याव्यात.

**<u>पदव्युत्तर व आचार्य पदवी अभ्यासक्रमातील विषयांचे वाटप :</u>**

पदव्युत्तर व आचार्य पदवी अभ्यासक्रमामध्ये विद्याशाखेबरोबरच विशिष्ट विषयास प्रवेश देण्यात येतात. भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या कोटयाकरिता राखून ठेवण्यात आलेले विषय वगळून व राज्याबाहेरील उमेदवारांसाठी २ टक्के जागा सोडून उर्वरित जागांचे 'महाराष्ट्र' कोटा व 'विद्यापीठ' कोटा म्हणजेच ५०:५० प्रमाणे विषयांच्या जागांचे आरक्षण व वाटप खालीलप्रमाणे करण्यात यावे.

(१) खुला आणि सामाजिक आरक्षित प्रवर्गाकरिता ५०:५० याप्रमाणात संबंधित महाविद्यालय / केंद्रामध्ये 'सामान्य वर्ग' आणि 'आरक्षित वर्ग' अशा दोनप्रकारे विषयनिहाय वाटप करण्यात यावे. 'सामान्य वर्गा'मध्ये राज्याबाहेरील उमेदवारांसाठी राखून ठेवलेल्या २ टक्के जागा समाविष्ट असाव्यात.

(२) विषयाच्या जागा, विषम संख्येत असल्यास 'सामान्य वर्ग' आणि 'आरक्षित वर्गा'स प्रत्येक शैक्षणिक वर्षामध्ये आळीपाळीने सम व विषम प्रमाणात विषयांचे वाटप करण्यात यावे.

(३) 'सामान्य वर्गा'तील विषयांचे प्रवेश गुणवत्तेनुसार देण्यात यावेत.

(४) (i)पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या सर्व विद्याशाखांमधील केंद्रनिहाय व विषयनिहाय सामाजिक आरक्षण निश्चित करून वाटणी केल्यानंतर, सामाजिक आरक्षित प्रवर्गांना विषयांचे वाटप करण्यासाठी प्रत्येक विद्याशाखेकरिता केंद्रनिहाय व विषयनिहाय स्वतंत्र ५० बिंदू नामावलीचा वापर करावा.

(ii) सदर बिंदू नामावली पुढील शैक्षणिक वर्षामध्ये क्रमशः पुढे वापरण्यात यावी.

(५) पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या धर्तीवरच आचार्य पदवी अभ्यासक्रमाच्या प्रत्येक विद्याशाखेकरिता स्वतंत्र बिंदूनामावलीद्वारे विषयाचे वाटप करण्यात यावे.

---

## प्रपत्र 'अ'

### चारही कृषी विद्यापीठांनी कुलसचिव यांच्या स्तरावर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी ठेवावयाच्या नोंदवहीचा नमुना

पीठाचे नाव:- ................................................................................................

यांचे नाव:- ................................................................................................

| श क्षमता:- ............ | भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या कोट्याकरिता ५ टक्के जागा ......... | राज्याबाहेरील उमेदवारासाठी २ टक्के जागा ......... |
|---|---|---|
| | 'महाराष्ट्र' कोटा : ........ जागा | 'विद्यापीठ' कोटा : ........ जागा |

| कोटा (M/U) | अनुसूचित जाती (१३%) | अनुसूचित जमाती (७%) | विमुक्त जाती (अ) (३%) | भटक्या जमाती (ब) (२.५ %) | भटक्या जमाती (क) (३.५ %) | भटक्या जमाती (ड) (२%) | इतर मागासवर्ग (१९%) | खुल्या जागा | शेरा | नोंद घेणाऱ्या अधिकाऱ्याची सही | पडताळणी करणाऱ्या अधिकाऱ्याची सही |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |

२७१

१९८१४

प्रपत्र 'ब'

रही कृषी विद्यापीठांनी कुलसचिव यांच्या स्तरावर पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी ठेवावयाच्या नोंदवहीचा नमुना

ठाचे नावः- ........................................................................................................

/ केंद्राचे नावः- ........................................................................................................

| क्षमताः- ............. | भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या कोट्यांकरिता १५ टक्के जागा ........... | राज्याबाहेरील उमेदवारासाठी २ टक्के जागा ........... |
|---|---|---|
| | 'महाराष्ट्र' कोटा : ........ जागा | 'विद्यापीठ' कोटा : ........ जागा |

| ोटा M/ U) | अनुसूचित जाती (१३%) | अनुसूचित जमाती (७%) | विमुक्त जाती (अ) (३%) | भटक्या जमाती (ब) (२.५ %) | भटक्या जमाती (क) (३.५ %) | भटक्या जमाती (ड) (२%) | इतर मागासवर्ग (१९%) | खुल्या जागा | शेरा | नोंद घेणाऱ्या अधिकाऱ्याची सही | पडताळणी करणाऱ्या अधिकाऱ्याची सही |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |

## प्रपत्र 'क'

ारही कृषी विद्यापीठांनी कुलसचिव यांच्या स्तरावर आचार्य पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी ठेवावयाच्या नोंदवहीचा नमुना

ापीठाचे नावः- ..............................................................

ावः- ..............................................................

| | |
|---|---|
| श क्षमता:- ...........- | राज्याबाहेरील उमेदवारासाठी २ टक्के जागा ......... |
| ' कोटा : ......... जागा | 'विद्यापीठ' कोटा : .........जागा |

| कोटा (M/U) | अनुसूचित जाती (१३%) | अनुसूचित जमाती (७%) | विमुक्त जाती (अ) (३%) | भटक्या जमाती (ब) (२.५ %) | भटक्या जमाती (क) (३.५ %) | भटक्या जमाती (ड) (२%) | इतर मागासवर्ग (१९%) | खुल्या जागा | शेरा | नोंद घेणाऱ्या अधिकाऱ्याची सही | पडताळणी करणाऱ्या अधिकाऱ्याची सही |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |

९८८१५

२८५/०

उपकुलसचिव (विद्या)
महात्मा फुले कृषि विद्यापीठ,
राहुरी जि. अहमदनगर